जळगाव दि.२३ (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने उद्या गुरुवार दिनांक २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने शैक्षणिक घटकांशी संबंधितांकडून अभिप्राय / सूचना उच्च शिक्षण संचालकांनी मागविल्या आहेत. त्यादृष्टिने विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, अधिष्ठाता मंडळ, अभ्यास मंडळांचे सदस्य, संस्थाचालक, पदाधिकारी, प्राचार्य, विभागप्रमुख, संचालक तसेच विद्यापीठाशी संबंधित घटक यांच्यासाठी उद्या गुरुवारी दुपारी ३.३० वाजतां ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात येणार आहे. या कार्यशाळेत कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, जळगाव विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक प्रा.सतीश देशपांडे हे मार्गदर्शन करणार आहेत. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी आराखडयाची प्रत विद्यापीठाच्या www.nmu.ac,in या संकेतस्थळावर विहीत नमुन्यात देण्यात आली असून शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित घटकांनी यासंदर्भातील आपल्या सूचना व अभिप्राय २५ सप्टेंबर पर्यंत pvc@nmu.ac.in या ईमेलवर पाठवाव्यात असे आवाहन प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी केले आहे.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२३ (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतिमवर्ष / अंतिमसत्राच्या ऑनलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने माहिती पुस्तिका (युझर मॅन्युअल) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिले आहे. दरम्यान विद्यापीठाने सराव चाचण्या (मॉक टेस्ट) सुरु केल्या असून बुधवारी अभियांत्रिकी विद्याशाखेच्या सराव चाचण्या पार पडल्या. विद्यापीठाने या ऑनलाईन /ऑफलाईन होणाऱ्या परीक्षेसाठी आता ६० प्रश्नांपैकी कोणतेही ४० प्रश्न सोडविण्याची मुभा विद्यार्थ्यांना दिली आहे.

विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन परीक्षार्थीसाठी माहिती पुस्तिका देण्यात आली आहे. ही पुस्तिका संलग्नित महाविद्यालयांना देखील ऑनलाईन पाठविण्यात आली आहे. या माहिती पुस्तिकेत परीक्षार्थीसाठी आवश्यक ती तांत्रिक माहिती देण्यात आली आहे. याशिवाय विद्यापीठाने या ऑनलाईन परीक्षा सुरळीत व्हाव्यात यासाठी प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयात ऑनलाईन परीक्षा समन्वयकांची नियुक्ती केली आहे. जवळपास २८५ समन्वयक विद्याशाखानिहाय नियुक्त करण्यात आले असून त्यांची यादी देखील ईमेल व भ्रमणध्वनीसह संकेतस्थळावर देण्यात आली आहे. या समन्वयकांची मंगळवारी ऑनलाईन प्रशिक्षण घेण्यात आले. विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा दरम्यान काही तांत्रिक अडचणी उदभवल्यास या समन्वयकांशी संपर्क साधता येईल. दरम्यान विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमनिहाय सराव चाचण्या (मॉक टेस्ट) घेण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने जाहिर केले होते. बुधवार दि.२३ सप्टेंबररोजी अभियांत्रिकीच्या मॉक टेस्ट घेण्यात आल्या. एकूण ४४७० विद्यार्थ्यांपैकी सायंकाळी ४ वाजेपर्यंत १९२४ विद्यार्थ्यांनी ही सराव चाचणी दिली. प्रत्येक विद्याशाखानिहाय टेलिग्राम ग्रुप देखील केले जाणार असून या ॲपव्दारे विद्यार्थ्यांना वेळोवेळी सूचना दिल्या जाणार आहेत अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी दिली.

---

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी